# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:10.12.2025** **वारः:बुधवार**

---

1. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनानिमित्त आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथ आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुरमू मार्गदर्शन करणार
2. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज मायक्रोसॉफ्ट कंपनीचा भारतात साडेसतरा अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा विचार
3. इंडिगोच्या विमानसेवेच्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर, कंपनीच्या विमान उड्डाणांच्या संख्येत 10 टक्के कपात करायचे सरकारचे आदेश
4. 16 वर्ष खालील मुलांना समाजमाध्यमांचा वापर करण्यावर ऑस्ट्रेलिया सरकारची कायद्याने बंदी, अशी बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया ठरला जगातला पहिला देश आणि
5. दक्षिण अफ्रिकेविरुद्ध टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतील कटकमध्ये झालेल्या पहिल्या सामन्यात, भारताचा दक्षिण आफ्रिकेवर 101 धावांनी विजय

**<u>राष्ट्रपती</u>**

आज आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन असून त्यानिमित्त नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथ राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुरमू उपस्थतीत राहून मार्गदर्शन करणार आहेत. 1948 साली आजच्या दिवशी मानवाधिकाराची सार्वभौम घोषणा करण्यात आली होती. सर्वांसाठी आवश्यक जनसेवांची उपलब्धता निश्चित करणे ही यावर्षीच्या मानवाधिकार दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. पंतप्रधान कार्यालयाचे मुख्य सचिव पि के मिश्रा यांच या कार्यक्रमात मुख्य भाषण होणार असून यामध्ये राष्ट्रीय आणि राज्य मानवाधिकार आयोगाचे प्रतिनिधि, तसच देशातील सर्व राज्य सरकारचे प्रतिनिधि आणि सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान,आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनानिमित्त महाराष्ट्रातल्या सर्व कारागृहांमध्ये आज विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमधील सर्व कारागृहांत ‘कैद्यांचे मानवी हक्क आणि संरक्षण’ या विषयी माहितीपुस्तिकेचं वाटप आणि मार्गदर्शन करून कायदेविषयक जागृती करण्यात येणार आहे.

**<u>मायक्रोसॉफ्ट</u>**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी असलेल्या मायक्रोसॉफ्ट कंपनीनं भारतात साडेसतरा अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा विचार जाहीर केला आहे. मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर आपल्या समाज माध्यमावरील संदेशात ही माहिती दिली. याआधीही जानेवारीत, मायक्रोसॉफ्टनं भारतात 3 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली होती. आशिया खंडातील ही सर्वात मोठी गुंतवणूक असून, या गुंतवणुकीमुळे, भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी पायाभूत सुविधा, कौशल्ये आणि सार्वभौम क्षमता निर्माण करता येतील आणि भारताच्या महत्वाकांक्षी योजनांना सहाय्य मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मायक्रोसॉफ्टच्या आशियातील या सर्वात मोठ्या गुंतवणुकीचे स्वागत केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेबद्दल संपूर्ण जगाच्या भारताकडून अपेक्षा असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान**

देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपनी असलेली कॉग्निझंट कंपनी देशात निरंतर करत असलेल्या कार्याबद्दल आणि आर्थिक गुंतवणुकीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केल आहे. समाजमध्यमावर काल पंतप्रधानांनी काल एक संदेशद्वारे सांगितल की, काल कॉग्निझंट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवी कुमार एस आणि अध्यक्ष राजेश वारियर यांच्याशी काल त्यांची भेट होऊन चर्चा झाली. देशातील युवा पिढी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती तंत्र ज्ञान क्षेत्रात मिळवत असलेल प्राविण्य भविष्यातील भारताचा या क्षेत्रातील जीवंत उज्जवल भविष्याच प्रतीक आहे अस ही मोदी यांनी आपल्या संदेशात म्हंटल आहे .

**संसद**

वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त काल राज्यसभेत विशेष चर्चा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या चर्चेला प्रारंभ केला. स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी महत्त्वपूर्ण ठरलेलं वंदे मातरम गीत 2047 मध्ये विकसित भारत झाल्यानंतरही तेवढंच महत्त्वाचं असेल असं प्रतिपादन शहा यांनी यावेळी केलं. स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेसने वंदे मातरम हेच ध्येय आणि घोषणा बनवली, असं प्रतिपादन राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी या चर्चेदरम्यान केलं. यावेळी खर्गे यांनी भाजपावर टीका केली.

लोकसभेत काल निवडणूक सुधारणांवर चर्चा झाली. निवडणूक यंत्रणेत सुधारणा करणं फार सोपं आहे, पण सरकारला ते करायचं नाही, असा आरोप लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या चर्चेदरम्यान केला. निवडणूक आयोगाच्या संरचनेत सत्ताधारी पक्षाचा हस्तक्षेप असल्याचा आरोप त्यांनी केला. खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेस खासदार मनीष तिवारी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई, कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनीही या चर्चेत भाग घेतला.

**बंदी**

16 वर्ष खालील मुलांना समाजमाध्यमांच्या वापरावर ऑस्ट्रेलिया सरकारने बंदी लागू केली असून अशी बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया जगातला पहिला देश ठरला आहे. आधुनिक काळात माहितीजाल आणि समाजमध्यमांचा अतिरेकी वापर रोखून त्यातून निर्माण होणाऱ्या एकटेपणासहित अनेक समस्यांपासून लहान मुले मुली आणि नवीन पिढीच रक्षण व्हाव या उद्देशाने ही बंदी घालण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज़ यांनी याबाबत कायदा करण्याची सप्टेंबरमध्ये घोषणा केली होती. त्यानुसार आता ऑस्ट्रेलियामध्ये 16 वर्षाखालील सर्व मुलामुलींना इंस्टाग्राम, फेसबुक, यूट्यूब, थ्रेड्स, एक्स, स्नैपचैट, किक, ट्विच, टिकटॉक, रेडिट ही समाजमाध्यमे वापरता येणार नाहीत. या कायद्याच वैशिष्ट्य अस कि त्याच उल्लंघन करणाऱ्या आई वडील आणि मुलांवर कारवाई करण्यात येणार नाही तर ते संबंधित समाज मध्यम चालवणाऱ्या कंपनीला 3 कोटी 20 लाख डॉलर्सचा दंड करण्यात येणार आहे .

दरम्यान, ऑस्ट्रेलियातील पालकांनी सरकारच्या या निर्णयाच स्वागत केल आहे मात्र समाजमाध्यमे चालवणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी या निर्णयाचा निषेध केला आहे.

**विमान कंपनी**

इंडिगोच्या विमानसेवेत गेल्या आठवडाभरापासून निर्माण झालेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर कंपनीच्या विमान उड्डाणांच्या संख्येत 10 टक्के कपात करायचे आदेश नागरी विमान वाहतूक संचालनालयाने दिले आहेत. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कंपनीनं केलेल्या कामाची माहिती घेण्यासाठी इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना काल पुन्हा

एकदा मंत्रालयानं बोलावलं होतं. 6 डिसेंबरपर्यंत रद्द झालेल्या विमानांच्या तिकिटाची पूर्ण रक्कम प्रवाशांना परत दिल्याची, तसंच उर्वरित रक्कम आणि सामान परत करायची प्रक्रिया वेगानं पूर्ण करायच्या सक्त सूचना दिल्याची माहिती एल्बर्स यांनी यावेळी दिली.

दरम्यान, नोव्हेंबर महिन्यात इंडिगो ने 64 हजार 346 विमान उड्डाणे निश्चित केली होती पण प्रत्यक्षात त्यातील 951 उड्डाणे रद्द झाली आणि 59 हजार 438 विमान उड्डाणे झाली. इंडिगो कंपनीला या संदर्भातील सविस्तर अहवाल नागरी विमान वाहतूक संचालनालयाने आज संध्याकाळी 5 वाजेपर्यंत सादर करण्याचे निर्देश.

**भारत-अमेरिका- परराष्ट्र**

भारत अमेरिका दरम्यान नियोजित व्यापार करारासंदर्भात काल भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि अमेरिकेच्या उप परराष्ट्र सचिव ॲलिसन हूकर यांच्यात नवी दिल्लीत चर्चा झाली. या चर्चेमुळे भारत-अमेरिका व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारीचा सविस्तर आढावा घेण्याची संधी मिळाली असं परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात सांगितलं आहे. दोन्ही पक्षांनी व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण सहकार्य, ऊर्जा सहकार्य, तंत्रज्ञान, महत्त्वाचे खनिज पदार्थ आणि विश्वासार्ह पुरवठा साखळ्या अशा महत्त्वाच्या द्विपक्षीय मुद्द्यांवर तसंच आंतरराष्ट्रीय आणि क्षेत्रीय घडामोडींबाबतही चर्चा केली. मुक्त आणि खुल्या हिंद-प्रशांत क्षेत्रासाठी आपली सामायिक बांधिलकी यावेळी अधोरेखित करण्यात आली. 21 व्या शतकातील लष्करी भागीदारी, जलद व्यापार आणि तंत्रज्ञान म्हणजे कॉम्पॅक्टच्या अंमलबजावणीला गती देण्यावरही या चर्चेत सहमती झाली.

**गोवा अपघात**

गोवा पोलिसांनी 'बर्च बाय रोमिओ लेन' नाईटक्लबचा एक मालक अजय गुप्ता याला ताब्यात घेतलं आहे. चौकशी झाल्यानंतर त्याला अटक करण्यात येईल. मागच्या आठवड्यात या नाईटक्लबमध्ये लागलेल्या आगीत 25 जणांचा मृत्यू झाला होता. नाईटक्लबचे आणखी दोन मालक पसार असून त्यांच्याविरुद्ध नोटीस जारी करण्यात आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत अटक करण्यात येणारी ही सहावी व्यक्ती आहे अशी माहिती गोवा पोलिसांच्या प्रवक्त्यानं दिली.

**क्रिकेट**

दक्षिण अफ्रिकेविरुद्ध टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतील कटक मध्ये झालेल्या पहिल्या सामन्यात, भारतानं काल दक्षिण आफ्रिकेला 101 धावांनी पराभूत केलं. भारतानं दिलेल्या 176 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ केवळ 74 धावांमध्ये गारद झाला. हार्दिक पांड्या 28 चेंडूत 59 धावा करून सामनावीर ठरला. अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी 2 गडी बाद केले.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा सामना येत्या गुरुवारी चंदीगड इथं खेळला जाणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल.

# नमस्कार